संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# सामाजिक लोकशाहीचे आधार डॉ. आंबेडकर

जगातील सर्वोत्कृष्ट लोकशाही आणि त्यासाठीच्या सर्वोत्कृष्ट संविधानाचे वरदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे प्राप्त झाले. त्यांनी केवळ लोकशाहीची मूल्ये जपली असे नाही तर सगळ्या जगालाच सामाजिक लोकशाहीचा नवा सिद्धांतही सादर केला. आज बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त त्यांना आदरांजली वाहत असताना त्यांच्या आदर्श विचारांचे स्मरण हे तितकेच महत्त्वाचे ठरते. सध्या देशभर संविधानाची विशेषत्वाने चर्चा होत असते. राजकीय सोयीसाठी संविधानाचा कोणत्याही प्रकारे केलेला वापर हा चुकीचाच ठरतो. बाबासाहेबांनी जे संविधान तयार केले ते केवळ राज्यकर्त्यांसाठी नव्हते. तर सामान्य माणसाच्या हिताचा विचार करून सर्व प्रकारच्या समतेचे तत्त्व शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी होते. म्हणूनच आजच्या दिवशी या महामानवाच्या या महान कार्याचे किती अभूतपूर्व योगदान आहे हे लक्षात घ्यावे लागेल. या देशाची घटना तयार करताना बाबासाहेबांच्या समोर वेगवेगळ्या देशातील घटनांचे प्रारूप तर होतेच. आणि संविधान तयार करताना केवळ कायदे आणि नियम यांचाच त्यांच्या डोळ्यापुढे विचार नव्हता. सर्वप्रकारे विविध तऱ्हेने नटलेल्या भारतीय समाजाचे चित्र त्यांच्या डोळ्यापुढे होते. अनेक प्रकारच्या जाती उपजाती, संप्रदाय, परंपरा, अस्पृश्यतेसारखा महाभयंकर प्रकार म्हणजे जिथे माणूसकी टिकवण्याचेच मोठे आव्हान होते. त्या संपूर्ण समाजाला एका विशिष्ट ध्येयाकडे घेऊन जाणे आणि सर्वांची समान उद्दिष्टे राहतील. अशा प्रकारची सामाजिक, लोकशाहीची व्यवस्था निर्माण करणे हे बाबासाहेब आंबेडकरांसाठी अधिक महत्त्वाचे होते. या देशाची विविधता आणि विपन्नावस्थेत असलेल्या सर्वसामान्य माणसाचा जीवनस्तर हा त्यांच्यादृष्टीने लोकशाहीचा आत्मा होता. म्हणूनच त्यांनी वारंवार अनेक बैठकांमधून सामाजिक लोकशाही असा शब्दप्रयोग करून समता, बंधुता, स्वातंत्र्य, या तीन तत्त्वांबरोबरच सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक जीवनमूल्ये अधिक महत्त्वाची असल्याचे सांगितले होते.

### सशक्त समाजरचनेचाच विचार

बाबासाहेबांच्या मते लोकशाही म्हणजे समाजाच्या सर्व घटकांकडे समतेने आणि आदराने पाहण्याची वृत्ती त्यांच्या दृष्टीने समाजाची एक आदरपूर्ण रचना अशीच त्यांची लोकशाहीची संकल्पना होती. त्यांनी असे म्हटलेही होते की, प्रत्येक नागरीकाला एका शाश्वत जीवनाची हमी ज्या व्यवस्थेतून दिली जाऊ शकते ती सामाजिक लोकशाही व्यवस्था आहे. घटना समितीच्या एका बैठकीत पंडित नेहरूंनी मांडलेल्या ठरावाला अनुमोदन करताना थोर विधिज्ञ डॉ. मुकुंदराव जयकर यांनी एक दुरूस्ती सुचवली होती. मुस्लीम लीग आणि काही संस्थानिक यांचे प्रतिनिधी घटना समितीत येईपर्यंत समितीचा उद्देश आणि साध्य या विषयीचा ठराव मंजूर करू नये. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या दुरूस्तीला उत्तर देताना जी भूमिका घेतली ती आपला देश सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुभंगलेला राहू नये. मुस्लीम लीगकडून जी फाळणीसाठी चळवळ सुरू आहे, हेदेखील चुकीचे असून, कधीतरी त्यांच्या मनावर प्रकाश पडेल आणि अखंड हिंदुस्तान हा सर्वांसाठी अधिक हितकर आहे असे वाटल्याशिवाय राहणार नाही इतक्या स्पष्ट शब्दात त्यांनी या दुरुस्तीचा विरोध केलाच. परंतु त्यातून हिंदुस्तानची अशा पद्धतीने विभागणी होऊ नये असा एक समताधिष्ठित किंबहुना सामाजिक लोकशाहीचाच दृष्टीकोन त्यातून प्रत्ययाला येतो. म्हणून आज आपण जी लोकशाही जपतो आहोत. त्याचा मूळ आधार सामाजिक स्तरावरचे समतेचे तत्त्व आहे. संविधानातून ज्या संसदीय लोकशाहीचा पुरस्कार केला गेला आहे ती वास्तविक बाबासाहेब आंबेडकरांनी संकल्पलेली सामाजिक लोकशाहीच आहे हे विसरून चालणार नाही. आणि तीच भारताच्या उज्ज्वल भवितव्यासाठीसुद्धा खूप मोलाची ठरते. आजचे राजकारणी ज्या संविधानाच्या निमित्ताने चर्चा किंवा वाद घालत असतात त्यांनी सर्वप्रथम बाबासाहेबांनी मांडलेला हा सामाजिक लोकशाहीचा विचार अंगिकृत केला पाहिजे. संविधानाचे मूळ स्वरूप समजून घेतानासुद्धा हीच बाब प्रकर्षाने लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. संविधानाची संरचना करताना बाबासाहेबांनी घेतलेले परिश्रम यासाठीच महत्त्वाचे ठरतात.

### ...तरच पुढच्या पिढीच्या लक्षात येईल

वर्षभरातून बाबासाहेब आंबेडकरांची जयंती आणि महापरिनिर्वाणदिनानिमित्त त्यांच्या कार्याचे आवर्जून स्मरण केले जाते. परंतु त्यांच्या या सगळ्या कार्याचा किंवा त्यांनी आयुष्यभर जोपासलेल्या जीवनमूल्यांचा सारभूत दस्तावेज जर कोणता असेल तर ते संविधान आहे. समताधिष्ठित समाजरचना हे केवळ भाषण करण्यापुरते विषय नाहीत. संविधानातल्या तरतुदींचे काटेकोर जर पालन केले तर त्यात समाविष्ट असलेली समाजरचना आपोआप आकाराला येते. ज्यामधून समाजाच्या भवितव्याचा खोलवर केलेला विचार आणि या देशाचा राज्यकारभार व्यवस्थित चालण्यासाठी व्यक्त झालेला लोकशाहीचा विचार एकत्रितपणे समोर येतो. म्हणूनच आज बाबासाहेबांच्या या ऐतिहासिक कार्याचे अवलोकन करताना संविधानाच्या रूपाने त्यांनी दिलेली सामाजिक लोकशाही लक्षात घ्यावी लागते. आज संविधानाचा केवळ राजकीय लोकशाहीच्या दृष्टीनेच अधिक गाजावाजा होत असतो. तो बाजूला सारून समाजाला केंद्रस्थानी आणणाऱ्या आणि संविधानाने पुरस्कृत केलेली लोकशाहीच भक्कम केली गेली पाहिजे. ज्या काळामध्ये संविधान तयार झाले त्यावेळची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, विषमता इतकी भयानक स्वरूपाची होती की, स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही देशाचा हा गाडा सुरळीतपणे कसा चालेल याची अनेकांना चिंता होती. परंतु ती दूर करण्याचे आणि देशाच्या भवितव्याचे चिंतन करणारी व्यवस्था डॉ. बाबासाहेबांमुळेच उपलब्ध झाली. आज देशभरात संविधान मंदिरे उभी राहिली जात आहेत. सामान्य माणसापर्यंत संविधानाचा विचार प्रत्येकापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न होतो आहे. परंतु त्याचा सामाजिक लोकशाही हा गोषवारा अधिक प्रभावीपणे बिंबवला गेला पाहिजे. तरच येणाऱ्या पिढीला ही संसदीय लोकशाही म्हणजे सामान्यांचा प्रकर्षाने विचार करणारी एक उत्कृष्ट समाजव्यवस्था आहे हे लक्षात येईल.